सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :- २२५१/मरातांसे/२०२०/१८ दिनांक :- १६ जून, २०२१

# - घोषणा -

**विषय :-** महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त (पूर्व) व (मुख्य) परीक्षेच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाबाबत

'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा' या परीक्षेमध्ये महाराष्ट्र वन सेवा, महाराष्ट्र कृषी सेवा व महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा या सेवेतील पदे समाविष्ट असून या तीनही संवर्गातील भरतीकरीता यापुढे 'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त पूर्व परीक्षा' या नावाने एकच संयुक्त पूर्व परीक्षेचे आयोजन करण्याबाबत आयोगाकडून दिनांक १८ डिसेंबर, २०२० रोजी प्रसिध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. आयोगाच्या दिनांक १८ डिसेंबर, २०२० रोजीच्या प्रसिध्दीपत्रकातील तरतुदींच्या अनुषंगाने 'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षेकरीता' परीक्षा योजना व अभ्यासक्रम नव्याने तयार करण्यात आला आहे.

३. 'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त पूर्व' परीक्षेत समाविष्ट असलेल्या संवर्गाकरीता (महाराष्ट्र वन सेवा, महाराष्ट्र कृषी सेवा व महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा ) मुख्य परीक्षा स्वतंत्रपणे घेण्यात येतील. तसेच मुख्य परीक्षेच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

४. 'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा' पूर्व व मुख्य परीक्षेची परीक्षा योजना व अभ्यासक्रम उमेदवारांच्या माहितीकरीता आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

५. महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची परीक्षा योजना व अभ्यासक्रम सन २०२१ मध्ये प्रसिध्द होणा-या जाहिरातीपासून लागू राहील.

सचिव

ठिकाण : मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग